# फुगेवाला

आला आला फुगेवाला
फुगे घेऊ चला पळा
लाल फुगा चेंडू जसा
पांढरा फुगा जणू ससा
पिवळ्या फुग्याची शेपटी
हलते बघा एकटी

छोट्या छोट्या फुग्यांचा
जणू घड द्राक्षाचा
फुगेवाल्या फुगा दे
पैसे मुला, आधी दे
आई, आई, फुगा घेऊ
नको मला दुसरा खाऊ

